# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 19.03.2026 वार- गुरुवार

---

**पुण्यात गुढीपाडवा शोभायात्रा**

पुण्यात गुढी पाडव्यानिमित्त आज लोकमान्य टिळक पुतळ्यापासून शोभायात्रा काढण्यात आली. पारंपरिक वाद्य आणि ढोल ताशांच्या निनादात पारंपरिक पोशाख परिधान करून लहानांपासून ज्येष्ठ नागरिक शोभायात्रेत सहभागी झाले. लहान मुलांनी मर्दानी खेळाची प्रात्यक्षिकं सादर केली. थोर लोकांच्या जीवनावरील आणि इतिहासावर आधारित विविध देखावे देखील साकारण्यात आले होते.

**पट**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिखली इथल्या म्हेत्रेवाडी शाळा क्रमांक ९३ इथं गुढीपाडव्याच्या निमित्त "गुढीपाडवा, पट वाढवा" या विशेष प्रवेश अभियानाचा आरंभ आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते आज करण्यात आला. शैक्षणिक प्रवासाची सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांचं स्वागत आयुक्तांच्या हस्ते करण्यात आलं.

**वाद**

पुणे महापालिकेच्या उरूळी देवाची इथल्या घनकचरा प्रकल्प विनानिविदा भूमिग्रीन कंपनीला देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप कॉंग्रेसनं केला आहे. प्रकल्पाची क्षमता ५०० मेट्रिक टनांपर्यंत वाढवून तो १० वर्षांसाठी चालवायला देण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी प्रति टन शुल्कवाढ प्रस्तावित आहे. सर्व कचरा प्रकल्पांचं ऑडिट करण्याची मागणी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष आणि नगरसेवक अरविंद शिंदे यांच्यातर्फे करण्यात आली आहे.

**कुत्रे**

पुणे महापालिका हद्दीत भटक्या कुत्र्यांचा प्रश्न गंभीर होत असून, नव्या समाविष्ट भागांसह त्यांची संख्या अडीच ते तीन लाखांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. आतापर्यंत महापालिकेनं सुमारे ३ लाख ३० हजार कुत्र्यांची नसबंदी केली आहे. शिंदेवाडी, भूगाव आणि रामटेकडी इथं प्रत्येकी एक हजार क्षमतेची निवारा केंद्रं उभारण्याचं नियोजन असून, यासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. काही ठिकाणी कामही सुरू झालं आहे अशी माहिती अतिरिक्त आयुक्त पवनित कौर यांनी दिली.

**रिक्तपदे**

पुणे महापालिकेच्या शाळांमध्ये मराठी माध्यमातील ८० आणि उर्दू माध्यमातील ११ शाळांमध्ये मुख्याध्यापक नाहीत अशी माहिती प्रश्नोत्तरातून समोर आली आहे. भाजपचे नगरसेवक योगेश मुळिक यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. महापालिका प्रशासनानं सांगितलं की, पदोन्नती प्रक्रियेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार येत्या नवीन शैक्षणिक वर्षापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचं नियोजन केलं जात आहे.

**एसटी**

पुणे एसटी विभागातून राज्यात सर्वत्र जाणाऱ्या प्रवाशांसाठी पुणे एसटी विभागाकडून १५ एप्रिल ते जूनपर्यंत ४५० अतिरिक्त बस सोडण्याचं नियोजन केलं आहे. प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असं आवाहन एसटी प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

साखर

राज्यातील 37 साखर कारखान्यांच्या सहवीजनिर्मिती प्रकल्पातून खरेदी केलेल्या विजेचं 308 कोटी रुपयांचं वीजबिल महावितरणकडे थकीत आहे. ही रक्कम कारखान्यांना देण्यासाठी राज्य सरकारनं आदेश द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघानं केली आहे. सहवीजनिर्मितीचे दर प्रति युनिटला 4 रुपये 50 पैसे ते 4 रुपये 99 पैसे केले असून, उद्योगास ते परवडणारे नाहीत. त्यातही शेतकऱ्यांची प्रलंबित वीज रक्कम वसूल करून दिली नाही तर पाच टक्के दर कपात करण्यात येते. त्यामुळं ही वसुली शक्य नसल्याचं संघानं स्पष्ट केलं आहे.

**कलावंत**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोथरूड शाखेतर्फे आज पुण्यातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात कलावंत गुढी उभारण्यात आली. याप्रसंगी योगेश सोमण, आनंद इंगळे, सारंग मांडके, सारंग भोईरकर यांच्यासह नाट्य परिषदेच्या कोथरूड शाखेचे अध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते.

**वास्तुरेखा**

युवा वास्तुकलातज्ज्ञांपुढे कृत्रिम बुद्धिमत्तेचं मोठं आव्हान आहे. मात्र, एआय हे साधन आहे, त्याचा मालक मनुष्य आहे, हे नेहमी लक्षात ठेवा असा सल्ला कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरचे सदस्य माजी प्राचार्य पुष्कर कानविंदे यांनी आज पुण्यात उदयोन्मुख वास्तुकलातज्ज्ञांना कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या 'वास्तुरेखा २६' प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी दिला. याप्रसंगी कॉलेजच्या 'वास्तुविधान' या वार्षिकाचे प्रकाशन पुष्कराज पाठक यांच्या हस्ते करण्यात आलं. भारतीय कला प्रसारिणी सभेद्वारे आयोजित प्रदर्शन परवा २१ तारखेपर्यंत बालगंधर्व कलादालनात खुलं राहणार आहे.

**कामायनी**

अंगावर नवा कोरा सलवार-कुर्ता, चेहऱ्यावर निरागस भाव अन नवीन कपड्यांचा आनंद, आपल्या अंगावरील नवे कपडे कुतूहलाने एकमेकांना दाखवत आनंदमय वातावरणात पुण्यातील कामायनी संस्थेतील विशेष मुलांनी आज नव्या वर्षाचं स्वागत केलं. गुढी पाडव्यानिमित्त कामायनी संस्थेतील ३०० विशेष मुलांना सलवार-कुर्त्यांचं वाटप करण्यात आलं.

**कुस्ती**

वाघोलीत सुरु असलेल्या अडुसष्ठाव्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत आज सकाळपासूनच अनेक चुरशीच्या लढती पहायला मिळाल्या. यामध्ये माती विभागात ५७ किलो वजनी गटात ओंकार निगडे आणि ८६ किलो वजनी गटात चंद्रहार नरळे या पुण्याच्या मल्लांनी अंतिम फेरीत धडक मारली. महाराष्ट्र केसरी किताबाच्या लढतींना आज संध्याकाळी सुरुवात होणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**